महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

क्र.उशिसं/शिष्य-२०२५-२६/डीबीटी/ दि. /११/२०२५

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय : दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविणेबाबत.**

संचालनालयामध्ये ऑनलाईन घेण्यात आलेल्या दि. २०/११/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज फार कमी प्रमाणात प्राप्त होत असलेबाबत चर्चा करण्यात आली. तथापि, अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे तसेच अर्जांची संख्या वाढविणेसाठी विशेष उपाययोजना करणेबाबत ठरविण्यात आले.

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. सन २०२५-२६ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०.०६.२०२५ पासून ऑनलाईनपध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणा-या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ३ | एकलव्यआर्थिक सहाय्य योजना |
| ४ | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ६ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्र वृत्ती |
| ७ | शासकीय संशोधनअधिछात्र वृत्ती |

| | |
|---|---|
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ९ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिक शास्त्रविषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |

सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे दि.०७.०७.२०२५ व दि.२५.०९.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमुद संकेतस्थळांवर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे, तसेच फी मंजूरी बाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे. तथापि, अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणे करीता दि. **२८.११.२०२५** ते दि. **१२.१२.२०२५** या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविण्यात यावा. याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.